विनम्र वीणा आणि बोलके कबुतर

– विश्वनाथ भसे

विनम्र वीणा आणि बोलकें कबुतर

(एक खुसखुशीत मनोरंजक बालकथा)

-: लेखक :-

विश्वनाथ रा. भसे

रम्य कथा प्रकाशन,

३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणें ३०

प्रकाशक :
बा. ग. मेहेंदळे,
रम्यकथा प्रकाशन,
३९२ नारायण पेठ, पुणें ३०

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रथमावृत्ति : जून १९६६
तृतीयावृत्ति : मे १९७१

किंमत २५ पैसे

मद्रक :
बा. ग. मेहेंदळे,
जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ, पुणें. २

विनम्र वीणा

आणि

बोलकें कबुतर

सारंगपूर नांवाच्या एका गांवांत सदाशिवराव नांवाचे एक धनाढ्य गृहस्थ रहात होते. त्यांच्या पत्नीचें नांव पार्वतीबाई असें होतें. नांवाप्रमाणेंच ती बाई अत्यंत साध्या रहाणीची आणि प्रेमळ स्वभावाची होती. दुष्टपणा–कपटीपणा जणूं तिला ठाऊकच नव्हता. सदाशिवरावांचें तिच्यावर जिवापाड प्रेम होतें.

अशा या दांपत्याच्या पोटीं वीणा नांवाची एकुलती एक मुलगी होती. तीदेखील आपल्या आईप्रमाणेंच भोळीभाबडी आणि प्रेमळ होती. ती दिसावयाला काळी–सांवळी असली तरी नाकीं–डोळीं नीटस व कुणाचेंहि मन प्रथमदर्शनींच ओढून घेईल इतकी गोड होती. सदाशिवरावांचें आणि पार्वतीबाईंचें तिच्यावर अतोनात प्रेम होतें. तिची कुठलीहि लहान–मोठी इच्छा पूर्ण करण्यास तीं नेहमींच तत्पर असत.

एकदां पार्वतीबाई कसल्याशा रोगानें आजारी पडल्या आणि

अंथरुणाला चांगल्या खिळून राहिल्या. त्यांचा तो आजार आटोक्यांत यावा म्हणून सदाशिवरावांनीं बऱ्याचशा मोठमोठ्या डॉक्टरांना, वैद्यांना आणि हकिमांना पाचारण केलें, देशीविदेशीं औषधांसाठीं पाण्यासारखा पैसा खर्च केला. परंतु पार्वतीबाईंना जडलेला आजारच मुळांत असाध्य स्वरूपाचा असल्यामुळें कुणाचाच कांहीं इलाज चालला नाहीं आणि सर्वांना त्या आजारापुढें हात टेकावे लागले.

जेव्हां पार्वतीबाईंचा आजार बराच विकोपाला गेला आणि सरतेशेवटीं जेव्हां त्यांना असें वाटूं लागलें कीं, आपला मृत्यु आतां जवळ आलेला असून आपण फारच थोड्या वेळच्या पाहुण्या आहोंत तेव्हां आपल्या अत्यंत लाडक्या आणि एकुलत्या एक लेकीला–वीणाला–आपल्याजवळ बोलावीत त्या म्हणाल्या,

'बाळ वीणा, आतां माझा मृत्यु माझ्या अगदीं जवळ

आलेला आहे. पण मला त्याचें कांहींच दुःख वाटत नाहीं. दुःख वाटतें तें केवळ याच गोष्टीचें, कीं माझ्या पश्चात् तुझें काय होईल ? आतांपर्यंत मीं तुझे खूप लाड केले, परंतु यापुढें ते होतील कीं नाहीं तें देवालाच ठाऊक ! पण इतकें खरें कीं, तूं जर देवावर अनन्य श्रद्धा ठेवून, धर्माला अनुसरून आणि समाजाच्या रीति-रिवाजाला धरून स्वतःच्या जीवनांत वाटचाल करीत राहिलीस तर देव तुझें निश्चित भलें करील. शिवाय मी स्वर्गांत गेल्यावर तेथून तुझ्यावर लक्ष ठेवीन तें निराळेंच !'

आपल्या मुलीला इतका उपदेश केल्यावर अल्पावधींत पार्वती-बाईंनीं प्राण सोडला.

पार्वतीबाईंच्या मृत्यूनें सदाशिवरावांना आणि इतर नाते-वाइकांना जें दुःख व्हावयाचें तें झालेंच; परंतु खरें दुःख जर कुणाला झालें असेल तर तें लहानग्या वीणाला होय. ती रोज आपल्या आईची एकेक आठवण काढून सतत रडत असे.

अशा तऱ्हेनें दिवसांमागून दिवस गेले आणि सर्वजण पार्वती-बाईच्या मृत्यूचें दुःख विसरले. परंतु हळव्या मनाची वीणा कांहीं आपल्या आईच्या मृत्यूचें दुःख विसरली नाहीं. जेव्हां जेव्हां तिला आपल्या आईची आठवण येत असे तेव्हां तेव्हां ती न चुकतां गुपचूपपणें स्मशानांत जात असे आणि ज्या जागीं तिच्या आईला अग्नि देण्यांत आला होता त्या जागेकडे पहात ती मूकमनानें अश्रु ढाळीत बसत असे.

सदाशिवरावांनादेखील पार्वतीबाईंच्या मृत्यूनें कांहीं कमी दुःख झालें नव्हतें. परंतु लवकरच त्यांच्या कामाच्या व्यापानें त्यांना तें दुःख विसरावयाला लावलें. थोडचा फार दिवसांतच ते आपल्या

दैनंदिन जीवनांत असे वागूं लागले, जणूं त्यांच्या प्राणप्रिय पत्नीचें—पार्वतीबाईंचें—निधनच झालें नव्हतें. उलट पत्नीविना त्यांचीं कामें वेळोवेळीं अडूं लागलीं म्हणून त्यांनीं आपलें दुसरें लग्न झटपट उरकून घेतलें आणि स्वतःसाठीं एक सुंदर बायको व आपल्या लाडक्या लेकीसाठीं एक आई घरांत आणली.

सदाशिवरावांच्या नवपरिणीत वधूचें नांव यशोदाबाई असें होतें.

यशोदाबाई तशा वयानें पोक्तच होत्या, परंतु सदाशिवरावांना साजेशा होत्या. सदाशिवरावांनीं जसें दुसरें लग्न करून यशोदाबाईंना घरांत आणलें होतें. तसेंच यशोदाबाईंनींदेखील आपल्या पहिल्या पतीच्या मृत्यूनंतर सदाशिवरावांशीं दुसरें लग्न करून त्यांच्या घरांत पाऊल ठेवलेलें होतें.

यशोदाबाईंना त्यांच्या पहिल्या पतीपासून दोन कन्यारत्नें झालेलीं होतीं. त्यांचीं नांवें कमला आणि विमला अशीं होतीं. यशोदाबाईंच्या आगमनाबरोबरच कमला आणि विमला या दोघींचेंहि सदाशिवरावांच्या घरांत आगमन झालेलें होतें.

कमला आणि विमला वीणाच्याच वयाच्या होत्या. त्या दिसावयाला वीणेपेक्षां अधिक उजळ आणि सुंदर होत्या; परंतु स्वभावानें मात्र त्या वीणेसारख्या नव्हत्या. त्या जितक्या खाष्ट तितक्याच दुष्टहि होत्या. वीणेशीं त्या सदैव भांडत असत, अगदीं कांहीं कारण नसतांनाहि ! बोलूनचालून सावत्रच बहिणी होत्या ना त्या !

आणि यशोदाबाई ?

यशोदाबाईंचें तर कांहीं विचारूंच नका. त्यांना तर वीणा

डोळ्यांसमोरहि नको असे. त्या सदोदित आपल्याच मुलींचे लाड करण्यांत गर्क असावयाच्या. वीणेचे लाड करणें तर दूरच राहो, पण त्या तिच्याशीं चुकूनहि एखादा गोड शब्द बोलत नसत.

कुणीं तरी म्हटलें आहे कीं, एक वेळ मातृसुख नशिबीं नसलेलें पत्करलें, परंतु सावत्र आईचा सहवास कुणाला घडूं नये. परंतु वीणेचें दैवच असें वाईट होतें कीं, तिला यशोदाबाईंसारखी दुष्ट स्त्री सावत्र आई म्हणून मिळाली होती.

यशोदाबाई तशा खूप चलाख होत्या. त्या सदाशिवरावांसमोर वीणेचे खूप लाड करीत. परंतु सदाशिवराव जेव्हां कामाच्या निमित्तानें बाहेर जात तेव्हां त्या तिचे अतिशय हाल करीत. अगदीं मोलकरणीलादेखील जीं कामें सांगावयाला लाज वाटावी अशीं अनेक कामें त्या तिला सांगत. त्यांतल्या त्यांत वीणेचें दुर्दैव असें कीं, सदाशिवराव फारकरून घरांतच नसत. कधीं कधीं तर ते दोन–दोन चार–चार दिवस घरींच येत नसत. यामुळें वीणेचे लाड होण्याचे प्रसंग फार थोडे येत आणि हालांचे प्रसंग मात्र तिच्या वांट्याला भरपूर येत.

तसें पहावयास गेलें तर वीणेचें वय अवघें तेरा वर्षांचें होतें. पण या वयांत बिचारीला स्वयंपाक करण्यापासून तें भांडीं घांसण्यापर्यंत, पाणी आणण्यापर्यंत आणि निवडणें, टिपणें करण्यापर्यंतच्या अनेक गोष्टी कराव्या लागत. या सर्व गोष्टी केल्यानंतर कुठें तिला शाळेंत जावयाला फुरसत मिळत असे.

पण वीणेला कुठल्याच कामाचें कांहींच वाटत नसे. प्रत्येक काम ती मुकाट्यानें करीत असे. आणि तसें केल्याशिवाय तिला गत्यंतरच नसे. कारण तिला पूर्णपणें ठाऊक होतें कीं, आपल्या

वाटयाला आलेल्या कामांत जर आपण हयगय केली तर आपली धडगत नाहीं.

पार्वतीबाईंच्या मृत्यूनंतर प्रथम प्रथम कांहीं दिवस वीणेला कुठलेंहि काम करण्यास जड जात असे. परंतु कांहीं काळानंतर तिला सर्व कामांचा सराव झाला आणि ती एखाद्या सराईत बाई-प्रमाणें आपलीं कामें करूं लागली. पण इतकें करूनहि यशोदा-बाईंनीं कांहीं वीणेचा छळ करण्याचें कमी केलें नाहीं. त्या कांहीं ना कांहीं कुरापत काढून तिचा छळ करीतच असत.

एकीकडे वीणेचा सारा वेळ एखाद्या मोलकरणीप्रमाणें कामें करण्यांत व्यतीत होत असे तर दुसरीकडे कमला आणि विमलाचा सारा वेळ नट्टापट्टा करण्यांत, इकडून तिकडे मिरविण्यांत आणि वीणेशीं कुरापती काढन भांडण्यांत व्यतीत होत असे. शाळेंत तर त्या चुकूनहि जात नसत. महिन्याकांठीं एखाद–दोन वेळां शाळेंत गेल्या तर गेल्या नाहीं तर नाहींच. यामुळें त्यांचा अभ्यास नेहमींच कच्चा राही आणि परीक्षेच्या वेळीं त्यांना नेमका गचका मिळे.

वीणेचें मात्र तसें नव्हतें. तिचा सारा वेळ जरी कामकाजांत व्यतीत होत असला तरी ती आपली शाळा कधींच चुकवीत नसे. शाळेंतला अभ्यास ती मन लावून करीत असेच, शिवाय घरचा अभ्यासदेखील ती भल्या पहांटें उठून पुरा करीत असे. यामुळें परीक्षेंत ती नेहमींच वरच्या क्रमांकानें पास होत असे.

दरवर्षींच्या परीक्षेंत होणारी वीणेची प्रगति पहावयाला जर पार्वतीबाई जिवंत असत्या तर त्यांनीं केवळ तिचें कोडकौतुकच केलें नसतें तर आपण वीणेसारख्या हुषार मुलीच्या आई आहोंत याबद्दल त्यांनीं स्वतःला धन्य मानलें असतें. पण वीणेचें दुर्दैव

असें कीं, त्या जिवंत नव्हत्या.

आणि यशोदाबाई ? त्यांचें तर प्रत्येक कृत्य मोठें विचित्र होतें. वीणेचें तिच्या हुषारपणाबद्दल कौतुक करण्याऐवजीं त्या तिचा द्वेषच करीत. आपल्या दोन्ही मुली दरवर्षीं न चुकतां नापास होतात आणि वीणा दरवर्षीं चांगल्या क्रमांकानें पास होते हें यशोदाबाईंना स्पष्ट दिसत होतें. परंतु त्या वीणेला नांवाजण्या-ऐवजीं आपल्या मुलींनाच नांवाजत.

पण वीणेला त्याचें कांहींच वाटत नसे. कौतुक काय किंवा द्वेष काय, जें वांट्याला येईल तें गोड मानून घ्यावयाचें हाच जणूं कांहीं त्या बालिकेचा दृढ संकल्प होता.

सदाशिवरावांचें घर मोठें प्रशस्त होतें. त्यांत दिवाणखाना होता, न्हाणीघर होतें, स्वयंपाकघर होतें. शिवाय पुढील दारीं मुलांना खेळण्या–बागडण्यासाठीं लांबरुंद पटांगण होतें आणि मागील दारीं भला मोठा बगीचाहि होता.

या बगिच्यांत नाना तऱ्हेचीं झाडें होतीं. त्या झाडांवर एक ना अनेक प्रकारचे पक्षी येऊन बसत. कांहीं पक्ष्यांशीं वीणेची चांगलीच ओळख झालेली होती. रोज सकाळ-संध्याकाळ जेव्हां वीणा तांदूळ निवडण्यासाठीं मागील दारीं परसांत येऊन बसत असे तेव्हां ते सारे पक्षी तिच्याभोंवतीं गोळा होत. मग वीणा त्या सर्वांपुढें तांदळाचे दाणे टाकी. ते खाऊन तृप्ति झाली कीं, ते सर्व पक्षी आपापल्या झाडावर निघून जात.

अशा तऱ्हेनें दिवसांमागून दिवस, महिन्यांमागून महिने आणि वर्षांमागून वर्षें निघून गेलीं आणि वीणेनें सतराव्या वर्षांत पदार्पण केलें. आतां ती लहान राहिली नव्हती. नुकत्याच तारुण्यांत पदार्पण केलेल्या तरुणींत जे बदल दिसून यावेत ते बदल आतां वीणेंत दिसून येऊं लागले होते. शिवाय ती आतां पूर्वींपेक्षांहि उजळ आणि सुंदर दिसूं लागली होती. वाढत्या वयाबरोबरच तिच्या गुणांतहि भलतीच वाढ झालेली होती. परंतु कमला आणि विमला जरी एरंडाप्रमाणें उंच वाढलेल्या असल्या तरी त्या गुणाच्या बाबतींत वीणेपुढें नेहमीं फिक्या पडत.

सारंगपूर गांवांतील जे लोक सदाशिवरावांच्या कुटुंबाला ओळखत होते ते नेहमींच वीणेची वाखाणणी करीत असत. यामुळें साहजिकच यशोदाबाईंचा आणि कमला-विमलाचा अधिकाधिक जळफळाट होऊन त्या तिचा जास्तच छळ करूं लागत. पण वीणेला त्याचें कांहींच वाटत नसे. कारण तो छळ सहन करून घेण्याची आतां तिला बरीच संवय झालेली होती.

सारंगपुरांत सदाशिवराव हे व्यापाराच्या बाबतींत एक प्रस्थ म्हणून ओळखले जात असल्यामुळें त्यांच्या बऱ्याच मोठमोठ्या

लोकांशीं ओळखी होत्या. या लोकांत सारंगपुरांतले मामलेदार माधवराव यांचा प्रामुख्यानें उल्लेख होत असे.

माधवराव हे हुद्यानें मोठे असले तरी स्वभावानें ते अत्यंत नम्र आणि दयाळू होते. सदाशिवरावांच्या घराण्याशीं त्यांचा फार जुना परिचय होता. पार्वतीबाईंनादेखील ते फार पूर्वीपासून ओळखत होते. त्यांच्यावर त्यांचा फार जीव होता. वीणेवरहि त्यांची आगळीच माया होती.

पार्वतीबाई जोंपर्यंत हयात होत्या तोंपर्यंत माधवरावांचे नेहमींच सदाशिवरावांकडे येणें–जाणें असे. परंतु पार्वतीबाई निवर्तल्यानंतर आणि यशोदाबाईंच्या आगमनानंतर मात्र सदाशिवरावांकडचें त्यांचें येणें–जाणें बंद झालें. यामुळें वीणेच्या डोक्यावर माधवरावांचा जो मायेचा हात होता तोहि दुरावला गेला आणि वीणेची गत एखाद्या अनाथ मुलीसारखी झाली.

माधवरावांना सुहास नांवाचा एक मुलगा होता. तो कॉलेजांत शिकत होता. दिसावयाला तो जितका सुंदर होता तितकाच स्वभावानें नम्र आणि प्रेमळ होता. वीणा आणि सुहास जेव्हां लहान होतीं तेव्हांपासूनच त्यांच्या मनांत एक अशी इच्छा होती कीं, आपल्या सुहासचें लग्न व्हावें तर तें केवळ वीणेशींच ! त्यांनीं आपली इच्छा कुणापुढें बोलून दाखविलेली नसली तरी ते वेळेची प्रतीक्षा मात्र करीतच होते.

एके दिवशीं माधवरावांच्या घरीं कसलासा धार्मिक उत्सव होता. त्याप्रसंगीं त्यांनीं सदाशिवरावांना आणि त्यांच्या घरच्या सर्व मंडळींना मोठ्या आग्रहानें आपल्या घरीं येण्याविषयींचें

आमंत्रण दिलेलें होतें. उत्सवाच्या निमित्तानें कां होईना, पण वीणेला आपल्या घरीं बोलावून तिची आणि सुहासची तोंडओळख करून द्यावयाची हा माधवरावांचा मानस होता. परंतु दुष्ट प्रवृत्तीच्या यशोदाबाई त्यांचा तो मानस पुरा होऊं देतील तर ना ? त्यांची बऱ्याच दिवसांपासून इच्छा होती कीं, आपली कमला माधवरावांच्या घरांत पडावी आणि त्या दिशेनें त्या तसा प्रयत्नहि करीत होत्या.

ज्या दिवशीं माधवरावांकडे उत्सव होता त्या दिवशीं कमला आणि विमलाची त्यांच्याकडे जाण्याची कोण धांदल उडाली होती ! सकाळपासून त्यांनीं जो नट्टापट्टा सुरू केलेला होता तो उत्सवाची वेळ होईपर्यंत संपलेलाच नव्हता.

आणि यशोदाबाई ? त्यांनीं तर वीणेनें आपल्या बरोबर येऊं नये म्हणून एक चांगलासा कट रचण्यास प्रारंभ केलेला होता. त्यांनीं काय केलें, घरांत डब्या-डब्यांतून भरून ठेवलेले तांदूळ, गहूं आणि निरनिराळ्या प्रकारच्या डाळी जाणूनबुजून एकमेकांत मिसळविल्या आणि त्या पुन्हां अलग अलग करण्यासाठीं वीणेजवळ आणून दिल्या.

वीणेवर जणूं संकटाचें आकाशच कोंसळलें. एरवीं तिला त्या भल्या मोठ्या कामाचें कांहींच वाटलें नसतें. परंतु त्या दिवशीं तिची तिच्या आवडत्या माधवकाकांकडे जाण्याची उत्कट इच्छा होती आणि ती आतां धान्य निवडण्याच्या कामामुळें पूर्ण होणें कदापि शक्य नव्हतें.

तरीपण यशोदाबाई जेव्हां कमला आणि विमला या दोघींना

बरोबर घेऊन माधवरावांकडे जाण्यास निघाल्या तेव्हां वीणेनें मोठ्या गहिंवरलेल्या मुद्रेनें त्यांना विचारलें, 'आई, मी तुझ्या-बरोबर माधवकाकांकडे येऊं काय ?'

तिनें हा प्रश्न विचारण्याचा अवकाश होता तोंच एखादी वीज कडकडावी त्याप्रमाणें यशोदाबाई कडाडल्या आणि वीणेला म्हणाल्या, 'अग कार्टे ! तुला वेड लागलें आहे कीं काय ? आणि तुला सांगितलेलें हें काम कोण पुरें करील, तुझी ती देवाघरीं गेलेली आई काय ? चल, जें काम करायला सांगितलें आहे तें आधीं पुरें कर आणि मग माधवरावांकडे येण्याच्या गोष्टी कर.'

यशोदाबाई इतकें बोलूनच थांबल्या नाहींत तर त्यांनीं वीणेच्या पाठींत दोनतीन रपाटे हाणले आणि मग त्या आपल्या दोन्ही मुलींना बरोबर घेऊन मोठ्या ऐटीनें निघून गेल्या.

इकडे वीणेला जें दुःख झालें तें काय विचारावें ! नेमक्या याच वेळीं तिला आपल्या आईची आठवण झाली आणि मग ती मागील दारीं परसांत येऊन मुसमुसून रडूं लागली. एकीकडे ती रडत होती आणि दुसरीकडे तांदूळ निवडीत होती.

रडतां रडतां निवडणें करीत असतांनाच अचानक ती ज्या ठिकाणीं बसली होती त्या ठिकाणीं तीं रोजचीं तीन कबुतरें येऊन बसलीं आणि तिच्याकडे एकटकपणें पाहूं लागलीं.

वीणेनें त्या कबुतरांपुढें तांदळाचे थोडेसे दाण टाकले; परंतु तीं कबुतरें कांहीं त्या दाण्यांना चोंची लावीनात आणि लावतील

तरी कशीं ? वीणा त्यावेळीं रडत होती ना ?

तीं कबुतरें तांदळाचे दाणे खात नाहींत हें पाहून वीणेला फार वाईट वाटलें आणि ती त्यांना म्हणाली, 'बाबांनो, तुम्ही रे कां उगाच दुःखी होतां ? मीं तर जन्माची दुःखी आहें. आज माझ्या-पुढें एवढं निवडणें आहे कीं, तें मी अनेक तास पुरे करूं शकणार नाहीं. तें जर मीं लवकरांत लवकर पुरें केलें तर मला माधव-काकांकडे उत्सवाला नक्कीच जातां येईल.'

कदाचित् वीणेचें तें बोलणें त्या कबुतरांना कळलें असावें, म्हणून कीं काय, तीं कबुतरें चटकन् तेथून उडालीं आणि थोड्याच वेळांत परत आलीं; तीं आपल्याबरोबर शेंकडों कबुतरांना घेऊनच ! त्या सर्व कबुतरांनीं एकाच वेळीं वीणेसमोर असलेल्या धान्यावर धाड घातली आणि हां हां म्हणतां तांदूळ, गहूं आणि डाळी अलग अलग केल्या.

त्यांची ती कार्यकुशलता पाहून वीणेला कोण आनंद झाला ! त्या सर्वांना मनापासून धन्यवाद देऊन वीणा घरांत आली आणि माधवकाकांकडे जाण्याची तयारी करूं लागली.

बालमित्रांनो, सांगा बरें, कोण असावींत तीं तीन कबुतरें ? नाहीं सांगतां येत ना ? मित्रांनो, पुष्कळदां असेंहि घडत असतें कीं, एखादी बाई आपल्या परमप्रिय मुलाला किंवा मुलीला एकटेंच सोडून देवाघरीं गेली तर तिचा जीव तिच्या मृत्यूनंतरहि कुठल्या ना कुठल्या प्राण्याच्या रूपांत आपल्या अपत्याभोंवतीं घुटमळत असतो. नेमकी हीच गत वीणेच्या बाबतींत झाली होती.

त्या तीन कबुतरांपैकीं एक कबुतर वीणेच्या आईचें रूप होतें आणि बाकीचीं दोन कबुतरें तिच्या मैत्रिणी होत्या.

आतां आपण वीणेकडे वळूं या.

हां हां म्हणतां वीणेनें माधवकाकांकडे जाण्याची तयारी केली आणि ती धांवत धांवत त्यांच्याकडे जाण्यास निघाली. माधवकाकांचें घर तिच्या घरापासून फारसें दूर नसल्यामुळें तेथें पोहोंचावयाला तिला फारसा वेळ लागला नाहीं.

वीणेनें जेव्हां माधवकाकांच्या घरांत पाऊल ठेवलें तेव्हां तिला तेथें एकच धामधूम चालूं असल्याचें आढळून आलें. सर्वजण इकडून तिकडे सारखे पळत होते आणि तोंडानें कांहीं ना कांहीं बडबडत होते. पण माधवकाका मात्र अगदीं स्तब्ध होते. त्यांची दृष्टि सारखी भिरभिरत होती. कदाचित् कुणालातरी ते शोधीत असावेत. वीणेला पहातांच त्यांना कोण आनंद झाला !

ताबडतोब ते तिच्याजवळ आले आणि तिच्या पाठीवरून आपला हात प्रेमळपणानें फिरवीत तिला म्हणाले, 'बाळ, किती दिवसांतून भेटते आहेस !'

इतकें बोलून ते तिला सुहासजवळ घेऊन आले आणि त्यांनीं त्या दोघांची एकमेकांना ओळख करून दिली.

सुहासलादेखील वीणेशीं ओळख करून घेतांना अतिशय आनंद वाटला. तिच्याशीं ओळख होऊन अजून पांच–दहा मिनिटें झालीं असतील नसतील तोंच तो तिच्याशीं असा बोलूं लागला, जणूं तिच्याशीं त्याची फार जूनी ओळख होती.

वीणेच्या आगमनानें सर्वांनाच आनंद झाला होता. परंतु सर्वांत दुःख जर कुणाला झालें असेल तर तें यशोदाबाईंना आणि कमला-विमला यांना होय. त्यांतल्या त्यांत माधवरावांनीं वीणेचें कौतुक केल्यामुळें तर त्यांच्या जळफळाटाला सीमाच उरली नाहीं.

यशोदाबाईंना तर खात्री होती कीं, वीणा नक्कीच हातांतलें काम अर्धवट सोडून आलेली असणार. त्यासाठीं त्या मनांतल्या मनांत म्हणत होत्या, 'या कार्टीला घरीं गेलें कीं, चांगला धडा शिकवितें.'

यानंतर जेवणाची वेळ झाली आणि सर्वजण पंक्तीला बसले. वीणाहि बसली पण माधवकाकांच्या शेजारीं. ते स्वतःच तिला आपल्या शेजारीं घेऊन बसले होते. अशा तऱ्हेनें जेवण मोठ्या मजेंत आटोपलें.

जेवणानंतर पानसुपारी झाली आणि मग माधवराव उपस्थित

लोकांसमोर दोन शब्द बोलण्यासाठीं उभे राहिले. ते म्हणाले, 'आजचा हा उत्सव म्हणजे माझ्या आयुष्यांतील एक फार मोठें पर्व आहे ! कारण या प्रसंगीं मीं एक आनंदाचा निर्णय घेतलेला आहे. तो निर्णय असा कीं, मी माझ्या सुहासचें लग्न सदाशिवराव यांची पहिली मुलगी वीणा हिच्याबरोबर लावणार आहें.'

माधवरावांचा तो निर्णय ऐकून सर्वांनीं टाळ्यांचा एकच कड-कडाट केला. यशोदाबाई, कमला आणि विमला मात्र मनांतल्या मनांत धुमसत राहिल्या. वरवर मात्र त्या आपल्याला आनंद झाल्याचें दर्शवायला चुकल्या नाहींत.

सायंकाळीं यशोदाबाई ज्या वीणा, कमला आणि विमला यांच्यासह घरीं परतल्या त्या रागानें फणफणतच ! रस्त्यांत त्यांना असें होऊन गेलें होतें कीं, कधीं एकदां आपण घरीं जातों आणि दिवसभराचा सारा राग वीणेवर काढतों.

घरांत पाऊल ठेवतांक्षणींच प्रथम त्यांनीं वीणेनें तांदूळ निवडून ठेवले आहेत किंवा नाहीं याची पहाणी केली. परंतु तिनें तें काम चोखपणें पुरें केलें असल्याचें पाहून त्यांना नवल वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. जें काम अनेक तास राबूनहि पुरें होण्यासारखें नव्हतें तें काम वीणेनें अल्पावधींतच पुरें केलेलें पाहून यशोदा-बाईनाच काय पण कुणालाहि आश्चर्य वाटणें स्वाभाविक होतें.

त्यावेळीं यशोदाबाईच्या ठिकाणीं दुसरी कुणी बाई असती तर तिनें वीणेला निश्चितपणें शाबासकी दिली असती. परंतु ती देणें तर दूरच राहिलें, उलट यशोदाबाई तिच्यावर भलत्याच रागावल्या

आणि तिला म्हणाल्या, 'अग कार्टे ! जें काम साऱ्या दिवसांत पुरें होणें शक्य नव्हतें तें काम एवढ्या लवकर पुरें करावयाला तूं एखादी चेटकीण आहेस कीं जादूगारीण ?'

यावर वीणेनें घाबरत घाबरत घडलेली सारी हकीकत यशोदाबाईंना सांगितली. ती ऐकून तर त्यांचा पक्का ग्रह झाला कीं, वीणेच्या अंगीं निश्चितपणें चेटूक वास करीत असावें मग त्यांनीं वीणेला असें कांहीं चोपून काढलें, कीं कांहीं विचारूं नका. शिवाय तिला एका अंधाऱ्या कोठडींत कोंडून ठेवलें तें निराळेंच !

रात्रीं सदाशिवराव जेव्हां घरीं परत आले तेव्हां यशोदाबाईंनीं त्यांना वीणेविषयीं सारी हकीकत अगदीं तिखटमीठ लावून सांगितली आणि त्यांना पटवून दिलें कीं, 'वीणेच्या अंगीं निश्चितपणें चेटूक वास करीत आहे.'

सदाशिवरावांच्या भोळ्याभाबड्या मनावर यशोदाबाईंच्या बोलण्याचा यथायोग्य परिणाम झाला आणि ते जेवून झोंपीं गेले.

मध्यरात्रीच्या सुमारास त्यांना एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत सकाळच्या तीन कबुतरांपैकीं बोलकें कबुतर आलें आणि तें सदाशिवरावांना म्हणालें, 'धनी, मी तुमच्या मृत पत्नीचा आत्मा असून गेल्या कित्येक दिवसांपासून इथेंच एका झाडावर कबुतराच्या रूपांत वास करीत आहें आणि ज्या दिवसापासून तुम्हीं वीणेसाठीं आई आणली आहे त्या दिवसापासून तिचे किती हाल होत आहेत हें मी उघड्या डोळ्यांनीं पहात आहें अन् सारें कांहीं मुकाट्यानें सहन करीत आहें. पण आज रहावलें नाहीं म्हणून

तुमच्याजवळ तक्रार करीत आहें. माझ्या बोलण्यावर तुमचा विश्वास बसत नसेल तर तुम्ही उद्यां स्वतःच्याच डोळ्यांनीं सारें कांहीं पहा म्हणजे आपल्या लाडक्या वीणेचे किती हाल होताहेत तें कळून येईल.'

यानंतर सदाशिवरावांना अचानक जाग आली आणि त्यांचें स्वप्न भंग पावलें. मग ते त्या स्वप्नावर बराच वेळ विचार करीत राहिले आणि नंतर मनांत कसला तरी निश्चय करून ते पुन्हां झोंपीं गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सदाशिवराव कामाच्या निमित्तानें घराबाहेर पडले पण कुठेंहि कामाला न जातां घरांतच एके ठिकाणीं लपून राहिले आणि तेथून ते दिवसभर वीणेचे काय हाल होतात ते पहात राहिले. तें पाहून त्यांच्या रागाला पारावार उरला नाहीं आणि त्यांनीं यशोदाबाईंना चोपून काढण्यास सुरुवात केली; पण ऐनवेळींच वीणा मध्यें पडली म्हणून त्यांचा बराचसा मार वांचला.

यानंतर सदाशिवरावांनीं वीणेला विचारलें, ' बाळ वीणा, तुझे इतके हाल होत असतांना आजपर्यंत तूं मला कांहींच कसें सांगितलें नाहींस ?'

यावर वीणा उत्तरली, ' बाबा, आईनें जर सांगण्यासारखें असें कांहींच केलें नाहीं तर मी तरी काय सांगणार ?'

तिच्या या उद्गारांनीं यशोदाबाईंचे डोळे खाडकन् उघडले आणि त्यांनीं तिला कडकडून मिठी मारली.

आज वीणा यशोदाबाईंची अत्यंत लाडकी लेक असून कमला आणि विमला यांची ती आवडती बहीण आहे.

लवकरच वीणेचें लग्न माधवरावांच्या सुहासबरोबर होईल आणि ती एखाद्या राजाच्या राणीसारखी राहूं लागेल.

-समाप्त-

प्रत्येक कुटुंबाच्या संग्रहीं असलींच पाहिजेत अशीं
अत्यंत वाचनीय तशींच अतीव चित्ताकर्षक
अशीं महान् संस्कारी २ पुस्तकें

१ गोष्टीरूप रामायण
२ गोष्टीरूप महाभारत

• भरपूर चित्रांनीं सालंकृत केलेलीं ० प्रातर्दर्शनीय मुख-
पृष्ठांनीं नटविलेलीं ० आशयपूर्ण मनोरंजक कथांनीं
भरलेलीं० आणि तरीहि प्रत्येकीं किंमत अवघी ५० पैसे

आपल्या जवळच्या विक्रेत्याकडे मागा
—: अगर लिहा :—
र म्य क था प्र का श न
३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणें -३०.

आमचें बालवाङ्मय व अद्भुतरम्य पुस्तकें
मिळण्याचीं मुंबईंतील प्रमुख ठिकाणें

मे. सेंट्रल प्रकाशन

७ पावबाला स्ट्रीट, न्यू चर्नी रोड, मुंबई ४.

सुखसागर पुस्तकालय

जी. टी. हायस्कूलजवळ, दादीशेठ अग्यारी लेन, मुं. २